# कृषि पणन विषयक बातम्या : ऑगस्ट 2022



विभाग सकाळ TODAY | पुणे, बुधवार, १० ऑगस्ट २०२२ | ५

## सामंजस्य करार : शेतीच्या मूल्यवर्धनातून मिळणार जास्तीचा बाजारभाव

# आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान आता थेट बांधावर

नारायणगाव, ता. ९ : "कृषी विज्ञान केंद्र व मॅग्नेट सोसायटी यांच्यात शेतीमालाच्या मूल्यवर्धनाबाबतचा 'सेंटर फॉर एक्सलन्स' बाबतचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे शेतकऱ्यांना शेती क्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान थेट बांधावर उपलब्ध होणार असून शेतमालाचे काढणी पश्चात होणारे नुकसान टाळून मूल्यवर्धनातून शेतमालाला जास्तीचा बाजारभाव मिळण्यास मदत होणार आहे," अशी माहिती कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष, कृषिरत्न अनिल मेहेर यांनी दिली.

नारायणगाव (ता.जुन्नर) येथे झालेल्या कार्यक्रमात मेहेर म्हणाले, की महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) हा एशियन डेव्हलपमेंट बँक आर्थिक सहाय्यित राज्य शासनाचा फ्लॅगशिप प्रकल्प महाराष्ट्रात सुरू झाला आहे. या प्रकल्पांतर्गत कृषी विज्ञान केंद्राची 'सेंटर फॉर एक्सलन्स' म्हणून निवड झाली आहे. 'मॅग्नेट' सोबत झालेल्या करारामुळे शेतकऱ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांसमवेत चांगल्या कृषी पद्धतीचा अवलंब, उत्पादन तंत्रज्ञान, काढणीपश्चात हाताळणी, उत्तम कृषी सेवांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यासाठी फायदा होईल. मॅग्नेट या फ्लॅगशिप प्रकल्पांतर्गत या भागातील केळी, सीताफळ, पेरू, डाळिंब, हिरवी मिरची, भेंडी आणि फुले (झेंडू, शेवंती) या पिकांची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मूल्य शृंखला विकसित करण्यास मदत होईल.

कृषी विज्ञान केंद्र सभागृहात झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सर व्यवस्थापक तथा 'मॅग्नेट'चे प्रकल्प संचालक दीपक शिंदे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. प्रशांत शेटे, शास्त्रज्ञ राहुल घाडगे, भरत टेमकर, निवेदिता शेटे, धनेश पडवळ, केपीएमजी कंपनीचे डॉ. अश्विनी दोरकर, मॅग्नेट सोसायटीचे प्रकल्प अधिकारी यादव आदी उपस्थित होते.

नारायणगाव (ता. जुन्नर) : सामंजस्य करारप्रसंगी मॅग्नेट प्रकल्पाचे अधिकारी आणि कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ.

### कराराचा यासाठी होणार उपयोग

- बाजारपेठेतील उत्पादन आणि उत्पादकता
- काढणीनंतरचे व्यवस्थापन
- उत्पादनातील नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाला सम[illegible]
- प्रशिक्षण, क्षेत्र भेटी,
- प्रात्यक्षिके, तंत्रज्ञानाद्वारे शेतकऱ्यांची क्षमता [illegible]

"'मॅग्नेट' अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या, बचत गट, खासगी उद्योजक यांच्या संस्थात्मक तांत्रिक आणि विपणनविषयक क्षमतांचा विकास करण्यात येईल. याद्वारे शेतकऱ्यांना विविध प्रशिक्षणे दिली जातील. पहिल्या टप्प्यात भेंडी, मिरची आणि केळी पिकाविषयी चांगल्या शेती पद्धतीविषयी प्रशिक्षणे राबविण्यात येतील.
– दीपक शिंदे, संचालक, 'मॅग्नेट'चे प्रकल्प

Maha.Times Dt.09/08/2022

# बाजार समित्यांचे होणार रँकिंग

## पणन संचालनालयाचा पुढाकार; बाजाराची सद्यस्थिती कळणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर पणन संचालनालयाकडून वार्षिक क्रमवारी (रँकिंग) जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतमालाची खरेदी-विक्री होणाऱ्या बाजार समितीची स्थिती कळणे सोपे होणार आहे. राज्यात प्रथमच बाजार समित्यांचे रँकिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पणन संचालक सुनील पवार यांनी याबाबत माहिती दिली. जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यामध्ये बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत पणन संचालनालयाच्या पातळीवर प्रकल्प अंमलबजावणी कक्ष कार्यरत आहे. स्मार्ट प्रकल्पाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध करणे हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

'राज्यातील बाजार समित्यांच्या इतिहासात रँकिंग करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर झाल्यानंतर राज्यातील इतर बाजार समित्यांच्या तुलनेत आपण शेतमाल नेत असलेल्या बाजार समितीचे स्थान शेतकऱ्यांना समजण्यास मदत होणार आहे; तसेच बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी अधिकाधिक सुविधा देण्याची निकोप स्पर्धा निर्माण होण्यास मदत होणार आहे,' असे पणन संचालक सुनील पवार यांनी सांगितले.

या निकषांबाबत बाजार समित्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीची तालुका उपनिबंधक किंवा सहायक निबंधक बाजार समितीस प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करून गुण देणार आहेत.

यासाठी या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले आहे. राज्यातील बाजार समित्यांची निकषनिहाय माहिती आणि गुणांची माहिती पणन संचालनालयास प्राप्त होणार असल्याचेही सांगण्यात आले.

### रँकिंगसाठी गुणांकन कसे असणार?

बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी शेतमालाच्या विक्रीसाठी बाजार समितीतील पायाभूत व इतर सुविधेनुसार निकष तयार करण्यात आले आहेत. २०२१-२२ या वर्षाच्या कामगिरीनुसार क्रमवारी ठरविण्यासाठी ३५ निकष आणि २०० गुण ठरवण्यात आले आहेत. त्यामध्ये पायाभूत सुविधा; तसेच इतर सेवा-सुविधांतर्गत १४ निकष असून, त्यासाठी एकूण ८० गुण, आर्थिक कामकाजाबाबत सात निकष आणि ३५ गुण, वैधानिक कामकाजाबाबत ११ निकष आणि ५५ गुण देण्यात आले आहेत. योजना उपक्रमातील सहभाग व इतर विषयी तीन निकष असून, त्यासाठी ३० गुण अशा एकूण २०० गुणांवर आधारित ही क्रमवारी असेल.

### रँकिंगसाठी निकष कोणते?

- आर्थिक कामकाज निकषात बाजार समितीचे वार्षिक उत्पन्न.
- बाजार शुल्क, शेतमालाच्या आवकेमध्ये झालेली वाढ, बाजार समितीचा आस्थापना खर्च; तसेच नियमित भाडेवसुली.
- संचालक मंडळाविरुद्ध झालेली बरखास्तीची कारवाई.
- खरेदीदारांच्या दप्तराची तपासणी आणि अडत्यांच्या वजनमापाची तपासणी.

# थेट पणन व्यवस्थेचा शेतकरी कंपन्यांना फायदा

**शासकीय योजना : भाग २**

**मिलिंद आकरे,**
**हेमंत जगताप**

**थेट पणन व्यवस्थेच्या दुसऱ्या प्रकारामध्ये प्रक्रियादार, निर्यातदार, किरकोळ विक्रेते यांच्यामार्फत शेतावर जाऊन शेतीमालाची खरेदी करण्यात येते. या विक्री पद्धतीमुळे मध्यस्थांची साखळी कमी होऊन मध्यस्थांमार्फत कमिशनचा खर्च कमी होऊन शेतकरी वर्गाला शेतीमालाच्या किमतीचा फायदा होतो.**



शहरी भागात थेट शेतीमाल विक्रीसाठी शेतकरी कंपन्यांना चांगली संधी आहे.

कृषी पणन व्यवस्थेत थेट पणन म्हणजे जेथे शेतकरी ग्राहकांसोबत व्यवहार करून शेतीमालाला योग्य बाजारभाव प्राप्त करून घेऊ शकतो. याचे शेतकरी बाजार आणि अन्न प्रक्रिया उद्योगांकडून शेतकऱ्यांच्या शेतातून थेट खरेदी (प्राथमिक ग्राहक) असे दोन प्रकार आहेत.

- हा बाजार खरेदीदार किंवा ग्राहक या दोघांना सुद्धा फायदेशीर ठरतो. या बाजारपेठामुळे पुरवठा साखळीतील समस्या कमी करण्यात मदत होते. शिवाय, ग्राहकांपर्यंत शेतीमालाची जलद वाहतूक केल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान टाळले जाऊन उत्तम व गुणवत्तापूर्ण शेतीमाल उपलब्ध होतो.
- या बाजारात बाजार शुल्क आकारले जात नाही, परंतु सेवा शुल्क विक्रेत्यांकडून घेतले जाते. सुमारे ४८८ हून अधिक शेतकरी बाजार वेगवेगळ्या राज्यांमध्ये कार्यरत आहेत. यामध्ये अपनी मंडी (पंजाब, हरियाना), रयतू बाजार (आंध्र प्रदेश, तेलंगणा), उझवर संधाई (तमिळनाडू), शेतकरी बाजार (महाराष्ट्र) आणि रायतू सनथे (कर्नाटक) हे बाजार प्रसिद्ध आहेत.
- शेतकरी बाजारांच्या अभ्यासातून असे परिस्थिती आहे. तथापि, स्थानिक ग्राहकांची संख्या मर्यादित असल्यामुळे भविष्यातील वाढीला सुद्धा मर्यादा येऊ शकतात. कोणत्याही बाजार क्षेत्रामध्ये जास्त उत्पादनाच्या क्षमतेबरोबरच ग्राहकांची मागणी सुद्धा त्याप्रमाणात असणे आवश्यक आहे.
- थेट पणन व्यवस्थेच्या दुसऱ्या प्रकारामध्ये प्रक्रियादार, निर्यातदार, किरकोळ विक्रेते यांच्यामार्फत थेट शेतावर जाऊन शेतीमालाची खरेदी करण्यात येते. थेट विक्रीमुळे मध्यस्थांची साखळी कमी होऊन मध्यस्थांमार्फत कमिशनचा खर्च कमी होऊन शेतकरी वर्गाला

### राज्यनिहाय थेट पणन परवाना सद्यःस्थिती

| राज्य | थेट पणन परवाना संख्या |
|---|---|
| मध्य प्रदेश | ४२ |
| आंध्र प्रदेश | ४५ |
| गुजरात | ५२ |
| राजस्थान | ५८ |
| तेलंगणा | ५९ |
| जम्मू व काश्मीर | ५९ |
| पंजाब | ६९ |
| हिमाचल प्रदेश | ७५ |
| कर्नाटक | ७८ |
| महाराष्ट्र | १४६४ |

समितीच्या नोटीसांना तोंड द्यावे लागत आहे. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत राज्यातील शेतकरी कंपन्याना थेट पणन परवाना मिळवून देण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते. त्याचप्रमाणे दूरध्वनीद्वारे अथवा प्रत्यक्ष चर्चा करून थेट पणन परवाना पणन संचालनालयाकडून (https://mahapanan.maharashtra.gov.in) प्राप्त होण्याच्या दृष्टीने शेतकरी कंपन्यांना मार्गदर्शन केले जाते.

जागतिक बँक अर्थसाह्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत सुमारे ४०६ शेतकरी उत्पादक कंपन्यांची निर्मिती करताना सुमारे ३०५ शेतकरी उत्पादक कंपन्यांनी कृषी निविष्ठा परवाने घेतले होते परंतु महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाप्रमाणे कृषी निविष्ठा पुरवठा साखळी निर्मिती करिता कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्याने त्या कंपन्यांना कृषी निविष्ठा परवाना घेऊन कोणताही फायदा झाला नाही. परंतु त्यापैकी काही कंपन्या महामंडळामार्फत सद्यःस्थितीत कामकाज करीत असून त्यांची चालू आर्थिक वर्षांत सरासरी २५ लाख रुपयांपर्यंत उलाढाल झाली आहे. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने सुमारे पाचशे शेतकरी कंपनी आणि सहकारी संस्था यांच्या माध्यमातून ५० कोटींपर्यंत कृषी निविष्ठा पुरवठा साखळीच्या माध्यमातून उलाढाल केली आहे. यामुळे या संस्थामधील संचालक मंडळामध्ये कृषी व्यवसायविषयक आत्मविश्वास निर्माण झाला आहे. यापुढील काळात ज्या शेतकरी कंपनी व सहकारी संस्था यांना महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत कृषी निविष्ठा साखळीत सहभागी व्हायचे असेल, त्यांनी

Agrowon Dt. 06/08/2022

सकाळ

# जुन्नर येथे उद्या द्राक्ष पीक प्रशिक्षण कार्यशाळा

**नारायणगाव, ता. ४ :** नारायणगाव (ता. जुन्नर) येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, कृषी विज्ञान केंद्र नारायणगांव, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र मांजरी पुणे, कृषी विभाग पुणे, कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नर यांच्या वतीने शनिवारी (ता. ६) द्राक्ष निर्यात विषयक क्षमता वृद्धी या बाबत शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले आहे. येथील कृषी विज्ञान केंद्रात कार्यशाळेचे उद्घाटन शनिवारी दुपारी एक वाजता राज्य कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. दुपारी दोन ते सायंकाळी सात या वेळेत विविध तज्ज्ञ शेतकऱ्यांना ऑक्टोबर छाटणी नंतर निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन घेण्यासाठी द्राक्ष बागेचे व्यवस्थापन कसे करावे या बाबत मार्गदर्शन करणार आहेत. अशी माहिती अध्यक्ष अनिल मेहेर यांनी दिली. या वेळी डॉ. अजय उपाध्याय हे अन्नद्रव्य, पाणी व खत व्यवस्थापन नियोजन या विषयी, डॉ. सहदेव डी. रामटेके हे संजीवकांचा वापर व कॅनोपी व्यवस्थापन याविषयी, किटकशास्त्रज्ञ डॉ. दीपेंद्र एस. यादव हे कीड व रोग नियंत्रण याविषयी, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र संचालक डॉ. आर. जी. सोमकुंवर हे द्राक्षातील कॅनोपी व्यवस्थापन याविषयी, सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक द्राक्षतज्ज्ञ मंगेश भास्कर हे निर्यातक्षम विषयुक्त द्राक्ष उत्पादन याविषयी, पीक संरक्षण तज्ज्ञ डॉ. दत्तात्रेय गावडे हे द्राक्ष बागेतील रोग नियंत्रण या विषयी मार्गदर्शन करणार आहेत. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी राहुल घाडगे (९४२२०८००११) यांच्याकडे संपर्क साधावा. असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ प्रशांत शेटे यांनी केले आहे.

Pune, District-Today
05/08/2022 Page No. 8

पुढारी

# द्राक्ष निर्यातवाढीसाठी नारायणगावला प्रशिक्षण

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

द्राक्ष निर्यातविषयक क्षमता वृध्दीसाठी राज्य कृषी पणन मंडळाच्या पुणे विभागीय कार्यालयाच्या पुढाकाराने नारायणगाव कृषी विज्ञान केंद्रात येत्या शनिवारी (दि. ६) प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जुन्नर तालुक्यातील अधिकाधिक द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी त्यात सहभागी होण्याचे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार व विभागीय उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन यांनी केले आहे. कृषी पणन मंडळाचे पुणे विभागीय कार्यालय, कृषी विभाग, मांजरी येथील राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, नारायणगाव कृषी विज्ञान केंद्र, जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समिती, द्राक्ष बागायतदार संघ व जुन्नर तालुका द्राक्ष उत्पादक संघाच्या संयुक्त विद्यमाने हा प्रशिक्षण कार्यक्रम होणार आहे.

कृषी निर्यात धोरणाची अंमलबजावणी करताना कृषिमाल निर्यात वृध्दीसाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून, योजनाही राबवित आहे. त्यानुसार, राज्यात द्राक्षे, डाळिंब, केळी या क्लस्टर्समधील क्षमता वृध्दीकरिता राज्य कृषी पणन मंडळाच्या पुणे विभागीय कार्यालयामार्फत क्लस्टर्समधील शेतकरी, पणन सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, निर्यातदार, प्रक्रियादारांना निर्यातविषयक क्षमता वृध्दीकरिता हा प्रशिक्षण कार्यकम आयोजित करण्यात आला आहे.

Pune Edition
Aug 4, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# 'मॅग्नेट' प्रकल्पाला मिळणार गती

## ५१ कोटींचा निधी जमा; विविध जिल्ह्यांमध्ये होणार मूल्यसाखळी विकसित

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : शेतीमधील मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी आशियायी विकास बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पास ५१ कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे. या निधीमुळे या प्रकल्पांतर्गत मंजूर असलेल्या विविध कामांना गती मिळणार आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्रात विविध जिल्ह्यांमध्ये मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासन आणि आशियायी विकास बँकेद्वारे १ हजार कोटींच्या निधीची मंजुरी आहे. मात्र काही तांत्रिक बाबींमुळे निधी रखडला होता. मात्र आता हा निधी वितरणास सुरुवात झाली असून, ५० कोटींचा निधी नुकताच वितरित करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत ११ फलोत्पादन पिकांच्या मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी २३० कोटींच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांसाठीच्या पहिल्या टप्प्यासाठी ५१ कोटी १९ लाखांचा निधी शासनाने वितरित केला आहे.

### ...अशी होणार मूल्यसाखळी विकसित

शेतीमालाच्या काढणीपश्चात तंत्रज्ञानाअभावी मोठे नुकसान होते. हे टाळण्यासाठी पॅकहाउस, प्रतवारी केंद्र, शीतगृह, रायपनिंग चेंबर, रेफर व्हॅन, फळे, भाजीपाला निर्जलीकरण तंत्रज्ञान, निर्यात सुविधा आदी.

### या पिकांच्या मूल्यवर्धनासाठी 'मॅग्नेट'

डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू. चिकू, भेंडी, मिरची (लाल आणि हिरवी) व फुले या ११ पिकांचा समावेश करण्यात आला आहे.

Agrowon Dt. 01/08/2022